सावदा येथे २७ सप्टेंबरला भुलाबाई महोत्सव

सावदा : केशव स्मृती प्रतिष्ठान संचलित ललित कला संवर्धिनी आणि गोदावरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी सावदा येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे भुलाबाई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे हे दुसरे वर्ष असून सहभागी होण्यासाठी २४ सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी करता येणार आहे.भुलाबाई महोत्सवात सहभागी होण्यासाठी तीन गट करण्यात आले आहेत. ३ ते १० वर्षे वयोगटासाठी लहान गट, ११ ते १६ वर्षे वयोगटासाठी मोठा गट, तर १७ वर्षांवरील मुली व महिलांसाठी खुला गट असणार आहे.स्पर्धकांनी स्वतः गायन, वादन तसेच टिपऱ्यांवर नृत्याचे सादरीकरण करावयचे आहे. प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे. प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकास रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच सहभागी सर्व संघ आणि संयोजीत सदस्यांना प्रमाणपत्र प्रदान केले जाणार आहे.रविवार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धेला प्रारंभ होईल. इच्छुकांनी २४ सप्टेंबरपर्यंत ९९६०५७७६९८ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा सावदा येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे नोंदणी करावी.महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी गौरी जोशी – ९९६०५७७६९८ यांच्याशी संपर्क साधावा. शाळा, महाविद्यालये, महिला मंडळे तसेच भजनी मंडळांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

लेवा जगत वर्धापन दिन विशेषांक

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

लेवा जगत

किंमत ५ रु.

संपादक : शाम वसंत पाटील

RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

Book - Post

Parvana(Subs.5000)/L-2/RNP-BSL-91/2020-2022

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :-
साप्ताहिक लेवा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

वर्ष २० वे | अंक ५२ वा | वार-रविवार | दि.२१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२६ | पाने-४ | पान क्र.-१

आविष्कार २०२६ प्रथम फेरीतील विजेत्यांची झोनल फेरीसाठी निवड

जळगाव : गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'आविष्कार २०२६' संशोधन स्पर्धेची प्रथम फेरी उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, संशोधन पद्धतींची ओळख व्हावी आणि नवनवीन संकल्पना व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संशोधनाला चालना मिळावी, हा या स्पर्धेचा उद्देश आहे.या प्रथम फेरीत ३१ टीममधील एकूण ८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध संशोधन संकल्पना पोस्टरच्या माध्यमातून सादर करत पर्यवेक्षकांसमोर आपल्या विषयाची संकल्पना, उद्दिष्टे व संशोधनाची दिशा प्रभावीपणे स्पष्ट केली.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या पोस्टर सादरीकरणाची पाहणी केली. विद्यार्थी दशेतच संशोधनावर काम करणे, नवनवीन गोष्टी शिकणे आणि आपल्या कल्पनांना संशोधनाची दिशा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी आवश्यक अनुभव व आत्मविश्वास मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी 'आविष्कार'सारख्या स्पर्धांमध्ये सातत्याने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी डॉ. तुषार कोळी (अधिष्ठाता), डॉ. हेमंत इंगळे (प्रमुख, ई अँड टी सी), डॉ. नितीन भोळे (प्रमुख, बेसिक सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज), डॉ. अनिल कुमार विश्वकर्मा (प्रमुख, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स), प्रा. महेश पाटील (प्रमुख, विद्युत विभाग), कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल बहिटे व प्रा. मयूर ठाकूर यांच्यासह प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.स्पर्धेत ह्युमॅनिटीज, लँग्वेजेस अँड फाईन आर्ट्स; कॉमर्स, मॅनेजमेंट अँड लॉ; प्युअर सायन्स; एप्लीकल्चर अँड ॲनिमल हसबंडरी; तसेच इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी या गटांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.प्रथम फेरीतील विजेतेह्युमॅनिटीज, लँग्वेजेस अँड फाईन आर्ट्सग्रुप १ : साहिल भोळे, देवयानी पाटीलग्रुप २ : जानवी राजपूत, भावेश सुपे, साक्षी घोगरे, खुशबू वारके, स्वेजल पारसेकॉमर्स, मॅनेजमेंट अँड लॉग्रुप १ : पियुष बाविस्कर, ऋषिकेश बाविस्कर, लालेश पाटील, सुमित निकम, तन्मय पाटीलप्युअर सायन्सग्रुप १ : कल्याणी शिंदे, मानसी खंबायटे, सानिका पाटील, वैशाली बरगत, आरती मोगरेग्रुप २ : लक्ष्मी चौधरी, मयुरी दीक्षित, सत्यम सूर्यवंशीएप्लीकल्चर अँड ॲनिमल हसबंडरीग्रुप १ : मयूर कोळी, कोमल पाटील, निखिल काथार, पवन चौधरीग्रुप २ : पार्थ पाटीलइंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीग्रुप १ : प्रणव थोरातग्रुप २ : युक्ता तळेले, उर्वशी पाटील, आदित्य पवार, सुमित राठोडप्रथम फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांची पुढील झोनल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. ही स्पर्धा १७ ऑक्टोबर २०२६ रोजी आर. जी. सपकाळ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक येथे होणार आहे.स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून डॉ. हेमंत इंगळे, डॉ. अनिल कुमार विश्वकर्मा, प्रा. महेश एच. पाटील व डॉ. तुषार कोळी यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. अतुल बहिटे व प्रा. मयूर ठाकूर यांनी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले.'आविष्कार २०२६'च्या यशस्वी आयोजनाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्य डॉ. केतकी पाटील व डॉ. वैभव पाटील (डी.एम. कार्डिओलॉजी) यांनी आयोजक, प्राध्यापकवर्ग व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

साप्ताहिक लेवा जगत २० व्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

श्री.नंदकिशोर महाजन
आमदार विधान परिषद,जळगांव
रा.तांदलवाडी ता.रावेर जि.जळगांव

हिंदी सप्ताहाचा उत्साहात समारोप

फैजपूर : धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील हिंदी विभागाच्या वतीने दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या हिंदी सप्ताहाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.हिंदी सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांच्या भाषिक, साहित्यिक व कलात्मक गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने रांगोळी, मेहंदी, काव्यवाचन, सामान्यज्ञान, वादविवाद, निबंधलेखन, चित्रकला आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा समारोप समारंभात प्रमाणपत्र व विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून कर्नल उत्तमरावजी पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा गणित विभागप्रमुख प्रा. हरीश नेमाडे होते.यावेळी एनसीसी प्रमुख प्रा. डॉ. आर. आर. राजपूत, हिंदी विभागप्रमुख तथा उपप्राचार्या प्रा. कल्पना पाटील, प्रा. ईश्वरजी ठाकूर, प्रा. विजयी सोनजे, प्रा. डॉ. सतीश पाटील, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. मनोहर सुरवाडे, प्रा. डॉ. सीमा बारी, प्रा. अर्चना वराडे, प्रा. जगदीश खरात, प्रा. विजय ताडे, प्रा. धीरज खैरे यांच्यासह हिंदी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हिंदी सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी आवड, आत्मविश्वास आणि साहित्यिक जाणिवा निर्माण होण्यास मदत झाली. विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिंदी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

साप्ताहिक लेवा जगत हार्दिक शुभेच्छा!
२० व्या वर्धापन दिनानिमित्त

सौ.दामिनी पवन सराफ
लोकनियुक्त नगराध्यक्षा नगरपरिषद,फैजपूर
श्री.पवन अनिल सराफ
नगरसेवक नगरपरिषद,फैजपूर

अवघे विश्व ज्यांना 'महान नायक' म्हणून ओळखते, त्या अलौकिक पुरुषाचा 'मोहन ते महात्मा' पर्यंतचा प्रवास कसा झाला संपन्न ते समजून घेण्यासाठी अवश्य भेट द्या.
महात्मा गांधींच्या जीवनकार्यावर आधारित जगातल्या पहिल्या ऑडिओ-गाइडेड मल्टिमिडीया संग्रहालयात रोमांचक इतिहास प्रत्यक्ष अनुभवू या.

या... पहा, गांधी तीर्थ!

"जगभरात महात्मा गांधीजींवरील मी पाहिलेल्या आजवरच्या संग्रहायातील, गांधी तीर्थ हे सर्वोत्तम संग्रहालय आहे."- ए. पी. जे. अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती

ग्रीन बिल्डींगचा सर्वोच्च दर्जा मिळालेलं भारतातील पहिलं संग्रहालय
ग्रीहा-फाइव्ह स्टार लीड्स-प्लॅटिनम रेटिंग प्राप्त

JAINAR19/23VJ

MAHARASHTRA TOURISM

• निसर्गाच्या सान्निध्यात जोधपूर दगडातील सर्वोत्तम कलाकृती • आतापर्यंत ६५ हून अधिक देशातील ५ लाखाहून अधिक पर्यटकांची भेट • अत्याधुनिक मल्टीमीडियाद्वारे ३१ खंडांमधे विभागलेली स्वातंत्र्याच्या ऐतिहासिक क्षणांची अनुभूती • मराठी, हिन्दी आणि इंग्रजी या तीन भाषांमधील ऑडियो गाइड उपलब्ध

फाउण्डेशनचे विशेष उपक्रम
• महात्मा गांधी अभ्यासक व संशोधकांसाठी भव्य ग्रंथालय व अभिलेखागार
• गांधीजींच्या कृतिशील विचारांवर आधारित समाजकार्य विषयात डिप्लोमा पाठ्यक्रम
• विद्यार्थी व बंदिजनांसाठी 'गांधी विचार-संस्कार' परीक्षांचे आयोजन
• वर्षभर विविध व्याख्यानमाला, चर्चासत्रे व शिबिरांचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरांवर आयोजन
• ग्रामविकास व महिला सशक्तीकरण उपक्रम

गांधी रिसर्च फाऊंडेशन
• सत्य • अहिंसा • शांती

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) भारत
दूरध्वनी: +९१ २५७-२२६००३३, २२६४८०३, ९४०४९५५३००, ९४०४९५५२२०
इ-मेल: info@gandhifoundation.net; वेबसाइट: www.gandhifoundation.net

गांधी तीर्थ संग्रहालय: सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत (सोमवार बंद)